# तुझे वेडं लागे




तुझे वेडं लागे सावळ्या विठ्ठला
प्रितीचा जिव्हाळा ठायी तुझ्या
तुझ्या रूप रंगात न्हाऊन गेलो
ठेवीतो कपाळा पायी तुझ्या

किती कोट पाऊले चालून आलो
करी घोष, ना होश उरला मला
वरी वाट सोपी तुझ्या ओढी लागी
कितीदा सांभाळ तूची केला

सदा सोबतीला संतांचा हा मेळा
कसा रे कृपाळा तू धाडीला
कीर्तनी रंगून त्यात मी नाचलो
अबीर गुलाल उधळीला

आज भिमातीरी कल्होळ भक्तीचा
माऊली, माऊली गजर चालला
कोटी कोटी रूपे तुझी जाहली अन
ठायी ठायी दृष्टांत तू रे दिला


**नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/

http://shabdshabd.blogspot.com/